# प्रकाश क्षीरसागर यांच्या 'माणसांची खैर नाही' पुस्तकाचे प्रकाशन

पणजी, ता.२१ (सांस्कृतिक प्रतिनिधी): मानवी जीवनाच्या वास्तवतेचे दर्शन 'माणसांची खैर नाही' मधून घडते. या ललित संग्रहात माणसाच्या वेगवेगळ्या प्रवृत्ती मांडल्या आहेत. साहित्यिक समाजाचा प्रतिनिधी असतो व तो समाजातील घटनांवर भाष्य करीत असतो. त्याचा प्रत्यय यातून येतो, असे प्रतिपादन डॉ. सुनील सावंत यांनी येथे केले.

प्रकाश क्षीरसागर यांच्या 'माणसांची खैर नाही' या ललित संग्रहाचे आज येथील गोवा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात माजी केंद्रीय मंत्री ॲड. रमाकांत खलप यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रमुख वक्ते या नात्याने प्रसिद्ध साहित्यिक डॉ. सावंत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ॲड. खलप, डॉ. सोमनाथ कोमरपंत, कला संस्कृती संचालनालयाचे उपसंचालक अशोक परब हे उपस्थित होते. हा सोहळा कोकण मराठी परिषद व माधव-राघव प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.




**पणजी : 'माणसांची खैर नाही' या पुस्तकाचे प्रकाशन केल्यानंतर प्रकाश क्षीरसागर, डॉ. सुनील सावंत, ॲड. रमाकांत खलप, डॉ. सोमनाथ कोमरपंत व अशोक परब.**

या पुस्तकावर भाष्य करताना डॉ. कोमरपंत म्हणाले, क्षीरसागर हे प्रकृतीने कवी आहेत. काव्यात्म संवेदनशीलतेची आत्मीयता कायम ठेवून त्यांनी हे ललित लेख लिहिले आहेत. या संग्रहात अनुभूतीच्या सखोलतेचे आश्वासक रूप दिसते.

ॲड. खलप यांनी सांगितले, की यात माणूस आणि निसर्ग असे दोन प्रवाह आहेत. माणूस निसर्गाची आणि माणसाचीच कत्तल करायला निघालाय, याचे प्रतिबिंब यात आहे. यातून त्यांचे निसर्ग आणि मानवाबद्दलचे प्रेम दिसून येते. अशोक परब यांनी, गोमंतकीय लेखक, प्रकाशक यांच्या पुस्तक प्रकाशनासाठी असलेल्या योजनेबद्दल सांगून, या पुस्तकाला त्याचा लाभ झाल्याचे सांगितले.

प्रकाश क्षीरसागर यांनी आपल्या मनोगतात, मित्रमंडळाची लेखनासाठी प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. यातील लेख कवितेच्या भावनेतूनच निर्माण झालेत, यातील अनुभव संवेदनशील मनाने टिपण्याचा प्रयत्न आहे, असे सांगितले. कोकण मराठी परिषदेचे सचिव सुदेश आर्लेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नंदा गुरव, रमेश वंसकर, सागर जावडेकर, भारती चौगुले यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ प्रदान केले. चित्रा क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.